gandhar
oil refinery (india) ltd.

July 23, 2026

To,

Listing Compliance Department
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai – 400001
BSE Scrip Code: 544029

Listing & Compliance Department
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, 5th Floor
Plot No. C/1, "G" Block
Bandra-Kurla Complex
Bandra (E), Mumbai – 400 051
Symbol: GANDHAR

Subject: Newspaper publication of the Standalone and Consolidated Un-audited Financial Results for the quarter ended June 30th, 2026

Ref: Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations")

Dear Sir(s)/Madam(s),

Pursuant to Regulation 47 of the SEBI Listing Regulations, we are enclosing herewith the copy of the Newspaper "The Economic Times" (English -National Daily Mumbai Edition)" and "Sakal" (Marathi Edition)" of today i.e., Thursday, July 23, 2026, wherein the extract of Un-audited (Standalone and Consolidated) Financial Results of the Company for the quarter ended June 30th, 2026, have been published.

Thanking you.

Yours Faithfully,

For **Gandhar Oil Refinery (India) Ltd**

Binal Shankar Khosla
Digitally signed by Binal Shankar Khosla
Date: 2026.07.23 15:40:08 +05'30'

Binal Khosla
Compliance Officer and Company Secretary
Mem. No.: A29802

Encl: As above

Registered Office
18th Floor, DLH Park, S.V.Road, Near MTNL
Goregaon West, Mumbai 400 062 India
CIN : L23200MH1992PLC068905
T: +91 22 4063 5600 F: + 91 22 4063 5601
E-mail: sales@gandharoil.com
Website : www.gandharoil.com

divyol
solutions within solutions

ET Markets
Beating Volatility
WWW.ETMARKETS.COM
MUMBAI, THURSDAY, 23 JULY 2026

Hope Greed Fear Panic Hope

SMART INVESTING
IndusInd Bank's Q1 Net Jumps 72% to ₹1,037 cr

KILL PILL

Generic drug exporters begin to bleed on D-St

Our Bureau

Mumbai: Shares of generic drug manufacturers in India fell Wednesday after US President Donald Trump said such medicines imported into the country would face 100% tariffs from August 2028 onward, and double that the next year.

Analysts said firms with US exposure to their revenues would feel the biggest impact from the change, and investors should now look at domestic focused companies.

Nifty's Pharma index fell 1.3% at close, while the benchmark Nifty 50 declined 0.8%. Among stocks, Lupin fell the most, down 4.3%, followed by Piramal Pharma, Ajanta Pharma, Aurobindo Pharma, Alembic Pharmaceuticals, and Granules (India) which declined between 2.5% and 4.2%.

"The tariff development is negative for Indian pharma companies, as most continue to manufacture drugs in India despite having US facilities," said Arijit Malakar, equity research analyst, Ashika Stock Broking.

"Expanding US manufacturing capacity would raise production costs, with much of the increase likely passed on to customers," Malakar said.

Others maintained that the tariffs may not have a significant immediate impact.

NO DONE DEAL YET

Prathamesh Masdekar, research analyst, StoxBox, said the move is still at a preliminary stage, and he expects further negotiations given India's critical role as a supplier of affordable generic medicines to the US.

The pharma sector has been one of the recent outperformers compared with the benchmark Nifty 50. So far in 2026, the Nifty Pharma index is up 13.3%, while the Nifty 50 is down 8.2%.

Maitri Sheth, research analyst, Choice Institutional Equities, said that the proposal brings generics—one of the key revenue contributors for Indian pharmaceutical companies in the US—within the scope of tariffs for the first time.

Continued on ▸▸ Smart Investing

INFLATION FEARS

Nifty Falls Below 24,000

Our Bureau

Mumbai: India's benchmark indices ended lower on Wednesday, as the rise in crude oil prices amid the intensifying conflict in West Asia triggered fresh selling across the board.

The NSE Nifty50 declined 191.45 points, or 0.79%, to close at 23,996.25, slipping below the crucial 24,000 mark. The BSE Sensex dropped 715.06 points, or 0.92%, to settle at 76,755.05.

Midcap and smallcap stocks also fell, with the Nifty Midcap 150 falling 1.06% and the Nifty Smallcap 250 losing 1.31%.

Most sector indices ended lower with Nifty Bank declining 1.2% and Nifty IT dropping 1.4%. Bucking the overall weakness, Nifty FMCG Index went up by 0.6%, while NSE Auto Index was marginally up by 0.2%.

Brent crude rose 3.7% to trade around $94.40 per barrel.

'External Sector Steady on Foreign Inflows'

Economic momentum and healthy forex reserves keep the outlook resilient: RBI report

Our Bureau

Mumbai: India's external sector remains steady with an improving outlook, aided by inflows of foreign investments despite the global uncertainties, the Reserve Bank of India (RBI) said in its state of the economy report in its latest monthly bulletin on Wednesday.

The farm sector is witnessing uneven southwest monsoon, but the impact on food inflation may be mitigated by comfortable foodgrain stocks, the RBI said.

The central bank said that despite the global economy undergoing an uncertain economic environment, supply chain disruptions, and fragmented trading relationships, the Indian economy remains on a strong footing. "Amidst these uncertainties, India remains among the fastest growing major economies across the globe and has been able to sustain the momentum in economic activities through June," the RBI said. "Both industrial and services sector indicators remained firm. The farm sector is witnessing uneven southwest monsoon, but the impact on food inflation may be mitigated by comfortable foodgrain stocks." India's foreign exchange reserves remain comfortable, providing cover for more than 10 months of goods imports and 88.5% of the external debt outstanding as at end-March 2026, the same level as of June.

STATE OF THE ECONOMY
MORE REPORTS ▸▸ SMART INVESTING

The momentum of external trade sustained as reflected in high growth in exports and imports in Q1 FY27. Data shows that merchandise exports increased 16% to $129.32 billion during April-June 2026-27, compared with $111.57 billion in the corresponding period a year earlier.

Imports during the quarter climbed 18% to $270.15 billion, resulting in a trade deficit of $37.42 billion in the first quarter, up from $20.85 billion in the same period last year.

Oil at $90-100 Will Impact Macros and the Market

ET Q&A

There is room for some catch-up rally in India after the underperformance and improvement in earnings growth, said **Sunil Koul**, global emerging markets equity strategist, Goldman Sachs. In an interview with **Nishanth Vasudevan**, London-based Koul spoke about foreign investors' outlook for India, the semiconductor trade and the rupee, among other topics. Edited excerpts:

When you talk to global asset allocators, what are they saying about India?

We have got more incoming requests for calls and meetings on India over the last couple of weeks than we have had in the last three to six months. Both the economy and corporate earnings have held up pretty well. The recent RBI measures have given people comfort that the rupee may not depreciate meaningfully from current levels. And then there has been more volatility in semiconductor stocks and the AI trade over the last two or three weeks. There has been a growing desire to diversify portfolios away from the tech side, where positions have been very concentrated. So, we are arguing for performance in Asia to broaden a little bit and for some of the laggard markets to recover. In that sort of laggard recovery rally, India should be able to perform better as well.

What has been the nature of the recent foreign flows into Indian markets?

The initial leg of the flows from mid-June was a broad-based pickup in interest in oil-importing markets, including India and South Africa. Moving into July, we have started to see some rotation flows within Asia. So, it's a mix of long-short allocations improving and some long-only money starting to allocate more.

Now that oil has rebounded, is that bad news for Indian equities?

Unless and until you see a full-blown war, which is not our base-case expectation, and an almost complete stoppage of flows, our year-end forecast for Brent crude is $80. That should be absorbed by the economy and the equity market. But, at the margin, it does put pressure on sentiment. If oil goes back to the $90-100 range, it will start to impact the macros and the market.

What is your reading of the recent sell-off in South Korea and Taiwan?

We are still pretty positive on the fundamentals of the memory space. Earnings of these companies in Korea and Taiwan have actually been strong, and the guidance has also been strong. We are in a cycle where demand is far stronger than supply. We are seeing tightness in the market, not just in 2026 and 2027, but well beyond 2027.

This year, because of pricing, Korea's earnings growth is more than 300%. Even for next year, we are expecting more than 30% earnings growth in Korea and about 30% earnings growth in Taiwan. So, what we are seeing is a positioning-led unwind, rather than any sort of fundamental concern about the cycle.

One thing that you hear often is that even after the run-up, valuations in Korea and Taiwan remain cheaper than India's.

That's why we still have Korea and Taiwan as overweight allocations, and India broadly neutral.

Earnings growth next year is about 30% in Taiwan and about 35% in Korea. In India, we are looking at 10% this year and 13% next year. Korea is still trading at six to seven times PE. Taiwan is a little bit higher in terms of multiples. If you look across the EM region, Taiwan is the most expensive market, and India is the second most expensive, both trading around 20-21 times. So, Taiwan and Korea still stack up better than India because there is higher earnings growth and, in Korea's case, a much cheaper valuation. In India's case, there is room for a catch-up rally in India after the underperformance and improvement in earnings growth.

What kind of returns would you expect from India over the next 12 months?

Earnings growth should compound around 11% on a 12-month basis. And that's what our return upside for Nifty is. If you pick the right pockets within the market, you can probably get stronger returns, mid-teen double-digit returns.

So, what do you like in India?

Banks. It's one pocket of the market where valuations are reasonably cheaper relative to their range and relative to the rest of the market. And if foreign appetite starts to come back, it's one large liquid pocket of the market, which is viewed as a macro bet on India.

Energy self-sufficiency and energy reliance has put the spotlight on power companies, renewables, utilities and power-equipment makers. Tourism is a theme where there is a likelihood of some potential earnings upgrades.

Continued on ▸▸ Smart Investing

भाईंदरमध्ये ३३ लाखांचे एमडी जप्त
भाईंदर (बातमीदार) : काशीगाव पोलिसांनी बुधवारी एमडी (मेफेड्रॉन) विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत तिघांना अटक केली आहे. या कारवाईत एकूण ३३ लाख ४० हजार ७५० रुपये किमतीचे एमडी जप्त करण्यात आले.

फास्ट न्यूज

भिवंडी महापालिका कर्मचाऱ्याचा हृदयविकाराने मृत्यू

भिवंडी (वार्ताहर) : भिवंडी महापालिकेच्या बांधकाम विभागातील कामगाराचा कामावर असतानाच हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना बुधवारी दुपारी घडली. नदीम अख्तर मोमीन (४०, रा. इस्लामपुरा, भिवंडी) असे मृत कर्मचाऱ्याचे नाव असून, झटका आल्यानंतर सहकाऱ्यांनी वेळेत रुग्णालयात दाखल न केल्याचा आरोप होत आहे.

साडेचार कोटींचे अमली पदार्थ जप्त

नालासोपारा (बातमीदार) : तुळिंज पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने नालासोपारा पूर्वेतील मोरेगाव परिसरात छापा टाकून ४ कोटी ८३ लाख १० हजार रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त केले. या कारवाईत नायजेरियन महिला ओमोरोगबे मेरिट एनाघेडे हिला अटक करण्यात आली. तिच्याकडून ६६३ ग्रॅम कोकेन आणि एक किलो १० ग्रॅम एमडीएमए जप्त करण्यात आल्या.

तरुणावर हल्ला; दोघांविरोधात गुन्हा

नवी मुंबई (वार्ताहर) : तळोजा फेज-१ येथे मित्रांसोबत उभ्या असलेल्या शहबाज शेख (२४) याच्यावर दोघांनी लाकडी बांबू आणि धारदार चाकूने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्ल्यानंतर आरोपी फरार झाले. तळोजा पोलिसांनी भावेश मढवी आणि त्याचा साथीदार गोल्या यांच्याविरोधात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असून, त्यांचा शोध सुरू आहे.

फेसबुकवरील प्रेमाचा खुनाने शेवट

ठाणे : फेसबुकवर झालेली ओळख, त्यानंतर फुललेले प्रेम आणि अखेर संशयाच्या विळख्यात अडकलेले नाते. या सगळ्याचा शेवट ठाण्यातील जांभळी नाका परिसरातील महाराजा लॉजच्या एका खोलीत मंगळवारी २३ वर्षीय संध्याच्या खुनाने झाला. या प्रकरणाचा उलगडा करीत ठाणे नगर पोलिसांनी अवघ्या काही तासांत तिचा प्रियकर नंदकिशोर गाडेकर याला अटक केली.

मालमत्तेसाठी शिक्षिकेचा खून

ठाणे : मालमत्ता बळकावण्याच्या उद्देशाने अविवाहित आंबिवली येथील संगीता चंदनशिवे या शिक्षिकेकडून मृत्युपत्रासह मालमत्तेशी संबंधित कागदपत्रांवर जबरदस्तीने स्वाक्षऱ्या करून घेतल्यानंतर काही तासांत नाक व तोंड दाबून तिचा खून करण्यात आला. त्यानंतर पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह नाशिकमधील रस्त्यालगत फेकून देण्यात आला. या थरारक कटाचा उलगडा ठाणे गुन्हे शाखेने करत दोघांना अटक केली असून, आणखी दोघा आरोपींचा शोध सुरू आहे.

नातलगांसाठी धर्मशाळा

राज्यातील सहा शासकीय रुग्णालयांमध्ये उभारणी

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २२ : सर ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर जे. जे. रुग्णालय समूहासह राज्यातील सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालयांच्या परिसरात रुग्णांच्या नातेवाइकांसाठी अत्याधुनिक धर्मशाळा उभारण्यात येणार आहेत. या धर्मशाळांमध्ये माफक दरात निवास, भोजन, स्वच्छता आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अहमदाबादस्थित 'सेवादान हेल्थ फाउंडेशन' ही संस्था हा प्रकल्प राबविणार असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने त्यास मंजुरी दिली आहे.

राज्य सरकारने वैद्यकीय शिक्षण विभागाला 'सेवादान हेल्थ फाउंडेशन'सोबत ४९ वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यास मान्यता दिली आहे. धर्मशाळेसाठी आवश्यक जमीन प्रतिवर्षी नाममात्र एक रुपया भाड्याने उपलब्ध करून दिली जाणार आहे. करार झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत संस्थेला इमारतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्तांकडे मंजुरीसाठी सादर करावा लागणार आहे. सर्व आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर दोन वर्षांच्या आत धर्मशाळेची इमारत उभारून ती कार्यान्वित करणे बंधनकारक असेल. या प्रकल्पाच्या देखरेखीसाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापण्यात येणार आहे. ही समिती धर्मशाळेच्या कामकाजाची नियमित पाहणी, तपासणी आणि मूल्यमापन करेल.

'या' रुग्णालयांचा समावेश

मुंबईतील सर जे. जे. रुग्णालय समूह, पुण्यातील बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालय, नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयाचा या योजनेचा समावेश आहे.

जागा राखीव ठेवण्याचा विचार

'सेवादान हेल्थ फाउंडेशन'ने गतुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान, आसाम, उत्तराखंड आणि छत्तीसगडसह अनेक राज्यांत अशा प्रकारच्या धर्मशाळा उभारल्या आहेत. दरम्यान, महापालिकेच्या सायन रुग्णालयाच्या पुनर्विकास प्रकल्पातही रुग्णांच्या नातेवाइकांसाठी निवास व्यवस्था उभारण्याचा प्रस्ताव आहे. सोबतच पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात उभारण्यात येणाऱ्या दोन १४ मजली इमारतींमध्ये यासाठी जागा राखीव ठेवण्याचा विचार सुरू आहे. या 'डॉर्मेटरी'मध्ये माफक शुल्कात निवास, स्नानगृह आणि स्वच्छतागृहासह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना आहे.

अपंगांसाठीच्या राखीव रेल्वे डब्यात महिलेवर हल्ला

ठाणे, ता. २२ : अपंग प्रवाशांसाठी राखीव असलेल्या रेल्वे डब्यात विनापरवानगी घुसलेल्या महिला आणि पुरुषाने जागा सोडण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून महिला प्रवाशाला मारहाण केल्याची घटना ठाणे ते पनवेलदरम्यान घडली. एवढ्यावरच न थांबता, घटनेचा व्हिडिओ चित्रित करणाऱ्या महिलेचा मोबाईल हिसकावून तो डिलिट करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. याप्रकरणी ठाणे लोहमार्ग पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्यांचा शोध सुरू आहे.

ठाणे स्थानकात अपंगांसाठी राखीव डब्यात चढलेल्या आरोपींनी घाटकोपर येथील सोनाली तेरवणकर (४४) यांना गुरुवारी (ता. १६) जागेवरून उठवण्याचा प्रयत्न केला. विरोध करत व्हिडिओ चित्रीत करताच मोबाईल हिसकावून तो डिलिट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मारहाणीनंतर दोघे पनवेल येथे पसार झाले. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

वादळी वाऱ्याचा कहर



बदलापूर : शहरात ताशी ८८ किमी वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यामुळे शीसमचे झाड दोन कारवर कोसळले. अनेक ठिकाणी झाडे, पत्रे व छप्पर उडाल्याने नुकसान झाले.

उलवेत विकृतीचा कळस

दोन दिवसांत दोन श्वानांवर अत्याचार; प्राणीप्रेमींमध्ये संताप

नवी मुंबई, ता. २२ (वार्ताहर) : उलवेत भटक्या प्राण्यांवर अत्याचाराच्या सलग दोन धक्कादायक घटना आल्या घडल्या आहेत. अवघ्या २४ तासांच्या अंतराने दोन श्वानांवर अत्याचार झाल्याने परिसरात संतापाची लाट उसळली असून, या दोन्ही घटनांमागे एकच विकृत असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

पहिली घटना रविवारी (ता. १९) रात्री सुमारे ११.४५ वाजता उलवे सेक्टर-२३ येथील 'सिद्धिविनायक प्लॅटिनम' इमारतीजवळ घडली. येथील एका दुकानाच्या शटरजवळ ३० ते ३५ वर्षे वयोगटातील एका विकृताने श्वानावर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला. हा प्रकार एका महिला वकिलाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी उलवे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या घटनेचा तपास सुरू असतानाच दुसऱ्याच दिवशी, सोमवारी (ता. २०) पहाटे सुमारे ४ वाजता उलवे सेक्टर-३ येथील 'जे. कुमार कन्स्ट्रक्शन'च्या पत्र्याच्या शेडजवळ विकृताने श्वानावर अत्याचार केल्याची आणखी एक घटना घडली. या प्रकरणात मनोज राजेंद्र राम (३५) या विकृताने श्वानावर अत्याचार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. या दोन्ही प्रकरणी उलवे पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

घटनांमागे एकच विकृत असण्याची शक्यता

पहिल्या घटनेतील आरोपी अजूनही अज्ञात आहे, तर दुसऱ्या घटनेतील आरोपीची ओळख पटली आहे; मात्र दोन्ही घटनांची वेळ, ठिकाण आणि गुन्हा करण्याची पद्धत यामध्ये असलेले साम्य लक्षात घेता, या दोन्ही घटनांमागे एकाच विकृताचा हात असण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात आहे. या संतापजनक घटनांमुळे उलवे परिसरातील नागरिक आणि प्राणिप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पश्चिम रेल्वे रुळालगतचा भराव खचला

मुंबई-सुरत मार्गावरील रेल्वे वाहतूक विस्कळित; अनेक गाड्या रद्द

पालघर, ता. २२ (बातमीदार) : महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका पश्चिम रेल्वेला बसला आहे. गुजरातमधील पारडी रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे रुळालगतचा भराव खचल्याने मुंबई-सुरत मार्गावरील रेल्वे वाहतूक विस्कळित झाली असून, अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. काही गाड्या विविध स्थानकांवर थांबविण्यात आल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत.

गुजरातमधील वलसाड, नवसारी आणि सुरत जिल्ह्यांत सलग तीन दिवस मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे वापी-पारडी रेल्वे स्थानकांदरम्यान रेल्वे रुळालगतची माती, मुरूम आणि खडी वाहून गेली. त्यामुळे सिग्नलचा खांब एका बाजूला झुकला असून, सुरक्षिततेच्या कारणास्तव पश्चिम रेल्वेचा डाऊन मुख्य मार्ग दुरुस्तीसाठी बंद करण्यात आला आहे. सध्या या मार्गावर एकेरी रेल्वे मार्गावरून वाहतूक सुरू आहे.

या परिस्थितीमुळे मुंबई-सुरत मार्गावरील अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या असून, काही गाड्या विलंबाने धावत आहेत, तर काही गाड्यांचे गंतव्यस्थान बदलण्यात आले आहे. वलसाड मेमू सेवा रद्द करण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यात शाळांना आज सुट्टी

हवामान विभागाने जिल्ह्याला आज गुरुवारी (ता. २३) रेड अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे मोठ्या पावसाची शक्यता व्यक्त केली जाते. अतिवृष्टीच्या अनुषंगाने डहाणू आणि तलासरी तालुक्यात शाळा महाविद्यालय आणि अंगणवाड्या यांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

पालघर : पारडी रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे रुळालगतचा भराव खचला.

मुंबई : एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांच्या उपस्थितीत युद्धनौका दाखल केली.

नौदलाच्या ताफ्यात आयएनएस मालवण

मुंबई, ता. २२ : भारतीय नौदलाच्या सामर्थ्यात आणखी एक महत्त्वाची भर पडली आहे. स्वदेशी तंत्रज्ञानावर विकसित करण्यात आलेली आयएनएस मालवण ही माहे श्रेणीतील दुसरी पाणबुडीविरोधी उथळ पाण्यातील युद्धनौका बुधवारी कारवार नौदल तळावर भारतीय नौदलात औपचारिकरीत्या दाखल करण्यात आली.

भारतीय हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कमिशनिंग सोहळ्यात पश्चिम नौदल कमांडचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल संजय वात्सायन, कोचीन शिपयार्डचे वरिष्ठ अधिकारी, माजी नौदल अधिकारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

आत्मनिर्भरतेचे प्रतीक

युद्धनौकेत ८० टक्क्यांहून अधिक स्वदेशी उपकरणे, प्रणाली आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे भारताच्या स्वदेशी जहाजबांधणी, संरक्षण उत्पादन आणि नौदल तंत्रज्ञान विकासाला मोठे बळ मिळाले आहे.

वाघनखाची ओळख

युद्धनौकेच्या प्रतीकचिन्हावर वाघनख अंकित करण्यात आले असून ते शौर्य, युद्धकौशल्य, चपळाई आणि धाडसाचे प्रतीक आहे. सायलेंट क्लॉज हे युद्धनौकेचे ब्रीदवाक्य आहे. अचूक प्रहार करण्याच्या तिच्या क्षमतेचे प्रतीक मानले जाते.

इर्शाळगडावर भरकटलेल्या ट्रेकर्सची सुटका

खालापूर, ता. २२ (बातमीदार) : मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे इर्शाळगडावर ट्रेकिंगसाठी गेलेले दोन तरुण वाट चुकून भरकटले. आपत्कालीन यंत्रणेला दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिस, स्थानिक ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांनी तातडीने शोधमोहीम राबवत दोघांची सुखरूप सुटका केली.

ठाण्यातील कोळीवाडा परिसरातील निखिल संतोष शिंदे (२२) आणि तन्मय रवींद्र शिंदे (१७) हे बुधवारी सकाळी चौक येथील इर्शाळगडावर ट्रेकिंगसाठी गेले होते. गडाचा अर्धा टप्पा पार केल्यानंतर अचानक मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचा वारा सुरू झाल्याने दोघे गोंधळले आणि वाट चुकले. घाबरलेल्या निखिलने आपत्कालीन यंत्रणेशी संपर्क साधल्यानंतर खालापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सचिन पवार यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. हेल्प फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली शोधपथक तयार करण्यात आले. स्थानिक मार्गदर्शक कमळू पारधी, वरोसेचे पोलिस पाटील योगेश प्रवळकर, कौस्तुभ कुंभार आणि आविष्कार यांनी शोधमोहीम सुरू केली होती.

कारने तीन दुचाकीस्वारांना उडवले

पुलावरून खाली पडल्याने एकाचा मृत्यू

भिवंडी, ता. २२ (वार्ताहर) : भिवंडी शहरातील उड्डाणपुलावर बुधवारी भरधाव कारने तीन दुचाकींना धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, एक दुचाकीस्वार थेट उड्डाणपुलावरून खाली रस्त्यावर पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

भिवंडीच्या दिशेने येणारी कार हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुलावर भरधाव वेगाने जात असताना ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर समोरून येणाऱ्या तीन दुचाकींना कारने जोरदार धडक दिली. या धडकेत एका दुचाकीवरील अज्ञात चालक उड्डाणपुलावरून खाली रस्त्यावर पडल्याने त्याचा मृत्यू झाला, तर शाहरुख खान (वय ३२) आणि आलम शाह (४७) हे दोघे गंभीर जखमी झाले असून, स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने भिवंडीतील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. अपघातातील कारचालकाला किरकोळ दुखापत झाली आहे. दरम्यान, मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे काम सुरू असून, शांतीनगर पोलिस या अपघाताचा अधिक तपास करीत आहेत.

भिवंडी : शहरात बुधवारी भरधाव कारने तीन दुचाकींना धडक दिली